-: प्रेस नोट :-　　　　दिनांक १०/०८/२०२५

प्रति,

**संपादक,**

----------------

**विषय :-** अवैध गावठी बनावटीचे पिस्टलसह बाळगणाऱ्या इसमावर स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांची कार्यवाही.

--- ००० ---

दिनांक ०९/०८/२०२५ रोजी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.संदीप पाटील स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी पोउनि श्री सोपान गोरे, पोहेकॉ/ प्रितम पाटील , पोकॉ/ बबन पाटील , पोकॉ/ सचिन घुगे, पोकॉ प्रदिप सपकाळे, चा पोहेकॉ/ भारत पाटील.अशांना कॅबिनमध्ये बोलावुन कळविले की, मिळालेल्या गोपनिय बातमी प्रमाणे सावदा पोलीस स्टेशन हद्दीतील रणगांव ता रावेर जि जळगांव गावातील एक इसम गावठी देशी बनावटीचे पिस्टल कमरेला लावुन गावात दहशत माजवण्याचा प्रयत्न करीत आहे. अशी माहिती मिळाल्याने आम्ही सदर ठिकाणी वर प्रमाणे पोलीस स्टॉप रवाना होवुन संशयीत इसमास सापळा रचुन ताब्यात घेवुन अंग झडीती घेतली असता त्याच्या जवळ गावठी बनावटीचा एक रिव्हाल्वर किंमत ४०,०००/- रु कि.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन नामे किरण ब्रिजलाल कोळी वय २४ वर्ष रा. रणगांव ता रावेर जि जळगांव यास ताब्यात घेवुन त्यास सावदा पोलीस स्टेशन येथे पुढील कार्यवाही कामी घेवुन आलो पोकॉ/८७८ सचिन रघुनाथ घुगे (स्थागुशा जळगांव) यांच्या फिर्यादी वरुन सावदा पोलीस स्टेशन येथे सीसीटीएनएस गुरन १९७/२०२५ भारीतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कारवाई हि मा.पोलीस अधिक्षक सो, डॉ.महेश्वर रेड्डी, मा.अपर पोलीस अधिक्षक श्री अशोक नखाते , वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संदीप पाटील स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांचे मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक श्री सोपान गोरे, पोहेकॉ/ प्रितम पाटील , पोहेकॉ/नितीन बाविस्कर पोना/ विकास सातदिवे, पोकॉ/ बबन पाटील , पोकॉ/ सचिन घुगे, पोकॉ प्रदिप सपकाळे, पोकॉ/ मयुर निकम चापोहेकॉ/ भारत पाटील. सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांच्या पथकाने कार्यवाही केली आहे.

**पोलीस अधीक्षक, जळगाव**
**करीता**

